841

सभा क्रमांक : ४५

जा.क्र./जिपसा/विवि/सभा/ /१५
वित्त विभाग, जिल्हा परिषद, सांगली.
दिनांक : 27/4/2015

याव्दारे अर्थ समिती सदस्य मा.श्री/श्रीमती.______________________ मु.पो. ________ तालुका __________ जिल्हा सांगली यांना कळविणेत येते की, अर्थ समितीची मासिक सभा **दिनांक ०५.०५.२०१५ रोजी दुपारी ०२.०० वाजता मा.उपाध्यक्ष जिल्हा परिषद,सांगली** येथे खालील नमुद केलेले कामकाज चालविणेसाठी बोलाविणेत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे ही विनंती.

सौ.शुभांगी पाटोळे
**मुख्य लेखा व वित्त अधिकारी तथा**
**सचिव अर्थ समिती जिल्हा परिषद सांगली.**

मा.श्री.लिंबाजी महीपती पाटील
**सभापती अर्थ समिती**
**जिल्हा परिषद सांगली.**

**विषय क्र.१ :-** दि.०९.०४.२०१५ रोजी घेणेत आलेल्या वित्त समिती सभेचा अहवाल वाचून कायम करणे.

**विषय क्र.२ :-** शासना कडील महत्वाचे शासननिर्णय व पत्राचे वाचन करणे.

**विषय क्र.३ :-** माहे मार्च २०१५ चा सर्व खात्यांचा योजना निहाय खाते निहाय अनुदान व खर्चाचा आढावा घेणे.

**मा.सभापती यांचे परवानगीने ऐनवेळी येणा-या विषयावरती चर्चा करणे.**

सौ.शुभांगी पाटोळे.
**मुख्य लेखा व वित्त अधिकारी तथा**
**सचिव अर्थ समिती जिल्हा परिषद सांगली.**

मा.श्री.लिंबाजी महीपती पाटील
**सभापती अर्थ समिती**
**जिल्हा परिषद सांगली.**

प्रत माहितीसाठी,
१) मा.अध्यक्ष, जिल्हा परिषद, सांगली
२) मा.सभापती,______________________________ विषय समिती, जिल्हा परिषद, सांगली.
३) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली.
४)मा.सभापती पंचायत समिती,मिरज/तासगांव/विटा/आटपाडी/कवठेमहांकाळ/जत/वाळवा/शिराळा/पलूस/कडेगांव.
५)खातेप्रमुख जिल्हा परिषद, सांगली,
सामान्य/ग्रा.पं/वित्त/छोपावि/बांधकाम/शिक्षण(प्राथ/माध्य/निरंतर)/आरोग्य/एन.आर.एच.एम./सर्व शिक्षण अभियान /सकवि/मबाक/पशुसंवर्धन/ग्रापापु/कृषि /मुद्रणालय/डिआरडिए./ **स्टेनो** /कार्यकारी अभियंता (स्थानिकस्तर ) वारणाली ऑफीस वि.बाग,सांगली.
६) गट विकास अधिकारी पंचायत समिती,
मिरज/तासगांव/विटा/ आटपाडी/कवठेमहांकाळ/जत/वाळवा/शिराळा/पलूस/कडेगांव.

टीप :- सदर सभेस खाते प्रमुखांनीच उपस्थित रहावयाचे आहे.

## दिनांक ०१.०४.२०१५ रोजी तहकूब होवून दिनांक ०९.०४.२०१५ रोजी झालेल्या ४४व्या अर्थ समिती मासीक सभेचा कार्यवृत्तांत

### भाग- पहिला

**उपस्थित सदस्य :**

१. मा.श्री.लिंबाजी महिपती पाटील, उपाध्यक्ष तथा सभापती अर्थ समिती.
२. मा.श्री.सुरेश गणपतराव मोहिते पाटील, सदस्य.
३. मा.श्री.भाऊसाहेब शामराव पाटील, सदस्य.
४. मा.श्री.तानाजी हरी यमगर, सदस्य.
५. मा.श्री. दत्ताजीराव निळकंठराव पाटील, सदस्य
६. मा.सौ. सुशिला हिंदूराव नांगरे, सदस्या .
७. मा.सौ. कल्पना वसंतराव सावंत, सदस्या.
८. मा.सौ.रुपाली विक्रमसिंह पाटील सदस्या.
९. मा.श्री.दिलीप दत्तू बुरसे, सदस्य

**उपस्थित अधिकारी :**

१) सौ.शुभांगी पाटोळे मुख्य लेखा व वित्त अधिकारी तथा सचिव वित्त समिती,जि.प.सांगली
२) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा),जि.प.सांगली. प्रतिनिधी
३) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.),जि.प.सांगली. प्रतिनिधी
४) कार्यकारी अभियंता,(इ.व द) जि.प.सांगली.
५) कार्यकारी अभियंता, (ग्रा.पा.पु.) जि.प.सांगली.
६) कृषि विकास अधिकारी, जि.प.सांगली.
७) जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, प्रतिनिधी जि.प.सांगली,.
८) कार्यकारी अभियंता (छोपावि) जि.प. सांगली. प्रतिनिधी
९) जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प.सांगली. प्रतिनिधी
१०) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला बाल कल्याण) जि.प.सांगली
११) जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जि.प.सांगली
१२) शिक्षणाधिकारी (प्राथ.) जि.प.सांगली.
१३) शिक्षणाधिकारी (माध्य.) जि.प.सांगली.
१४) शिक्षणाधिकारी (निरंतर) जि.प.सांगली.
१५) एन. आर. एच. एम. प्रतिनिधी.
१६) प्रतिनिधी सर्व शिक्षा अभियान.

## दिनांक ०१.०४.२०१५ रोजी तहकूब होवून दिनांक ०९.०४.२०१५ रोजी झालेल्या ४४ व्या अर्थ समिती मासीक सभेचा कार्यवृत्तांत

## भाग पहिला

आजच्या अर्थ समितीस उपस्थित असलेले मा.उपाध्यक्ष तथा सभापती अर्थ समिती व सदस्य, खातेप्रमुख व कर्मचारी यांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी स्वागत करुन मा.उपाध्यक्ष यांचे परवानगीने सभेच्या कामकाजास सुरुवात करणेत आली.

विषय क्र.1 – मागील सभा दिनांक 10/02/2015 रोजी घेण्यात आलेल्या वित्त् समिती सभेचा अहवाल वाचून कायम करणेत आला.

विषय क्र. 2 व 3- शासनाकडील महत्त्वाचे शासन निर्णय व पत्रांचे वाचन करणेबाबत व माहे डिसेंबर 2015 चा सर्व खात्यांचा योजनानिहाय व खातेनिहाय अनुदान व खर्चाचा आढावा घेणेबाबत विषय सादर केला असता खातेनिहाय माहिती खालीलप्रमाणे देण्यात आली.

**मा.श्री.सुरेश मोहिते,सदस्य :-** जिल्हा बदली पती पत्नी एकत्रिकरण प्रस्तावामध्ये नोकरी विषयी बोगस दाखले जोडून प्रस्ताव सादर केलेले आहेत. हे चौकशी अहवालामध्ये उघड झालेले आहे. या शिक्षकांच्यावर कारवाई प्रस्तापित करणेत यावी.

**मा.श्री.तानाजी यमगर, सदस्य :-** शिक्षकांना अशा प्रकारचे बोगस काम करणे चूकीचे आहे. त्यांचेवर कारवाई झालीच पाहिजे. शिक्षण विभागाने याबाबत अधिकाऱ्यांचे आदेश काढून प्रत्यक्ष भेटी देवून अहवाल घेतलेले आहेत.

**मा श्री.सुरेश मोहिते,सदस्य :-** शिक्षक म्हणून काम करीत असताना अशा प्रकारच्या चुका करणे बरोबर नाही.

**मा.श्री.तानाजी यमगर, सदस्य :-** संबधीत शिक्षक व संस्थेवर देखील कारवाई प्रस्तापित करणेत यावी.

**शिक्षणाधिकारी (निरंतर) :-** सगळेच प्रस्ताव बोगस आढळून आलेले नाहीत काही नियमाप्रमाणे सादर करणेत आलेले आहेत.

**मा.श्री.लिंबाजी पाटील,सभापती :-** ज्या शिक्षकांचे दाखले बोगस असल्याचे आढळून आलेले आहे त्यांना अपात्र करणेत यावे.

**मा.श्री.सुरेश मोहिते,सदस्य :-** अशा शिक्षकांना अपात्र करणारच आहोत मात्र कारवाई देखील होणे आवश्यक आहे.

**मा.श्री.लिंबाजी पाटील,सभापती :-** यावर मा.मुख्य कार्यकारी अधिकारी योग्य निर्णय घेतील.

**शिक्षणाधिकारी (प्राथ.) :-** शिक्षण विभागाकडील स्वीय निधीचा खर्च ९८ टक्के झालेला आहे.

मुख्य लेखा व वित्त अधिकारी :- शिक्षण प्राथमिक कडे प्रेसची देयके ३ लाख ६१ हजाराची प्रलंबित आहेत.

शिक्षणाधिकारी (प्राथ.) :- प्रलंबित देयके देणेची कार्यवाही करीत आहे.

कार्यकारी अभियंता (छोपावि) :- यांनी आपल्या विभागाकडील आढावा सादर केला यामध्ये मुख्यत्वे करुन स्वीय निधीचा सर्व खर्च झालेला आहे. डी.पी.सी.कडील जलयुक्त शिवार अभियान निधी प्राप्त झालेला आहे. यांचे काम निहाय वाटप करणेत येणार आहे.

मुख्य लेखा व वित्त अधिकारी :- छोपावि कडील प्रेसची देयके प्रलंबित आहेत.

मा.श्री.सुरेश मोहिते,सदस्य :- कार्यालयीन सादील मधून प्रेसची बिले तात्काळ अदा करणेत यावीत.

कार्यकारी अभियंता (इवद) :- यांनी आपल्या विभागाकडील आढावा सादर केला यामध्ये मुख्यत्वे करुन जिल्हा नियोजन समितीचा खर्च झालेला असून स्वीय निधीचा ८५ टक्के खर्च झालेला आहे.

मा.श्री.सुरेश मोहिते,सदस्य :- कामे पूर्ण झालेली आहेत पण बिले अदा करणेसाठी किती निधीची आवश्यकता आहे.

कार्यकारी अभियंता (इवद) :- कामे पूर्ण होवून अंदाजित एक कोटीच्या जवळपास बिले अदा करणेची आहेत. सी.आर. व एस.आर. चा निधी खर्च करणेत आलेला आहे.

श्री.तानाजी यमगर, सदस्य :- कुकटोळी व हिंगणगांव रस्त्यांचे काम अद्याप पूर्ण केलेले नाही.

कार्यकारी अभियंता (इवद) :- या महिना अखेर पर्यंत काम पूर्ण होणार आहे.

जिल्हा कृषी अधिकारी (प्रतिनिधी) :- यांनी आपल्या विभागाकडील आढावा सादर केला यामध्ये मुख्यत्वे करुन स्वीय निधी मधील कृषी विभाग गोडावूनसाठी १५ लाख तरतूद असून १२ लाख पंचायत समितीला वर्ग करणेत आलेले आहे.

मा. श्री.सुरेश मोहिते,सदस्य :- गोडावून बाबतचे हेड चुकीचे झालेले आहे हे बांधकाम विभागाकडे होणे आवश्यक होते.

कार्यकारी अभियंता (इवद) :- यामध्ये पंचायत समितीला निधी वर्ग करणेचा प्रश्नच येत नाही. या कामाला प्रशासकिय मान्यता देणेचे अधिकार आपल्याला आहेत. निधी पंचायत समिती वर्ग करणेत आलेला असेल तर टेंडर रद्द करणे आवश्यक आहे.

मुख्य लेखा व वित्त अधिकारी :- पंचायत समितीला वर्ग केलेले पैसे परत घेण्यात यावेत.

मा.श्री.तानाजी यमगर, सदस्य :- टेंडर रद्द करणेत येवू नये. निधी परत घेणेत यावा.

मा.श्री.लिंबाजी पाटील,सभापती :- विंड सोलर दुरुस्ती काय झाले एक वर्ष झाले बंद आहे.

जिल्हा कृषी अधिकारी (प्रतिनिधी) :- संबधीत ठेकेदाराची १० टक्के रक्कम आपल्याकडे शिल्लक असून ठेकेदाराला सूचना देवून दुरुस्ती करुन घेत आहे.

**मा.श्री.लिंबाजी पाटील,उपाध्यक्ष तथा सभापती :-** जत तालुक्यामध्ये ५ एकर जागेमध्ये रोपवाटीका करणेसाठी तरतूद करणेत आलेली होती पण त्या ठिकाणी अतिक्रमण होत असल्याचे दिसून येत आहे.

**मा.श्री.सुरेश मोहिते,सदस्य :-** जि.प.मालकीच्या रिकाम्या जागा कंपौड करणेसाठी कृषी विभागाकडील निधी काढून घेवून बांधकाम विभागाला देणेत यावा.

**मुख्य लेखा व वित्त अधिकारी :-** कृषी विभागाला निधी रोपवाटीका योजना तयार करणेसाठी दिलेला आहे. यामध्ये कंपौड करता येणार नाही.

जिल्हा कृषी अधिकारी (प्रतिनिधी) :- बायोगॅस १५०० चा लक्षांक तो पूर्ण केलेला आहे. विघयो च्या लाभार्थ्यांना लाभ दिलेला आहे.

**मा.श्री.सुरेश मोहिते,सदस्य :-** कृषी विभागाअंतर्गत खरेदी होणारे साहित्य चांगल्या दर्जाचे घेणेत यावे.

**जिल्हा कृषी अधिकारी (प्रतिनिधी) :-** आपण सर्व खरेदी शासन दर करारानुसार करीत आहोत.

**समाजकल्याण अधिकारी :-** यांनी आपल्या विभागाकडील आढावा सादर केला यामध्ये मुख्यत्वे करुन स्वीय निधीचा खर्च ८६ टक्के झालेला आहे.

**मा.श्री.सुरेश मोहिते,सदस्य :-** वसंत घरकुल दुसऱ्या हप्त्यांचे काय झाले कामे पूर्ण झालेली आहेत पण पैसे मिळाले नाहीत.

**समाजकल्याण अधिकारी :-** ६० हजार पर्यंतचा निधी वर्ग करण्यात आलेला आहे उर्वरित १५ हजार मागणी प्राप्त झालेनंतर पंचायत समितीला वर्ग करणेत येणार आहे. स्थायी समितीमधील चर्चेनुसार निधी पंचायत समितीला वर्ग केला जात आहे.

**मा.श्री.सुरेश मोहिते,सदस्य :-** रायगांव प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनेचे विज कनेक्शन तोडण्यात आलेले आहे. तरी देखभाल दुरुस्तीमधून तरतूद करणेत यावी.

**कार्यकारी अभियंता (ग्रापापु) :-** या योजनेची ५० टक्के सुध्दा वसुली होत नाही. सर्व प्रादेशिक योजनेसाठीं दिड कोटी निधी प्राप्त झालेला आहे. योजनानिहाय पाहणी करुन वितरण करणार आहे. तसेच दलितवस्ती साठी नळ कनेक्शन व शौचालयासाठी १०३ लाख प्राप्त झालेले असून त्याप्रमाणे कामे घेतली जाणार आहेत.

**जिल्हा आरोग्य अधिकारी :-** यांनी आपल्या विभागाकडील आढावा सादर केला यामध्ये मुख्यत्वे करुन स्वीय निधीचे निम्मी रक्कम पंचायत समितीला वर्ग केलेली आहे. मुख्यालयातील हृदय शस्त्रक्रिया २० लाख शिल्लक असून इतर सर्व खर्च झालेला आहे.

**मा.श्री.सुरेश मोहिते,सदस्य** :- आपल्याकडील स्वीय निधी खर्च केलेल्या योजनानिहाय माहितीची प्रत देणेत यावी.

**जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी** :- आपल्या विभागाकडील आढावा सादर केला यामध्ये मुख्यत्वे करुन स्वीय निधीमधील ५४ लाख तरतूद केलेली असून ९८ टक्के खर्च झालेला आहे. शेळीवाटपासाठी तालुक्याला वित प्रेषण सोडले आहे.

**मा.श्री.सुरेश मोहिते,सदस्य** :- कामधेनू योजनेअंतर्गत औषध खरेदी काय झाले

जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी :- यामध्ये तरतूद उपलब्ध असून तांत्रिक मान्यता मा.आयुक्त यांचेकडून वेळाने आलेली आहे. पुरवठा आदेश देत असून एप्रिल मे मध्ये पुरवठा होणार आहे.

उपमुख्य कार्यकारी अधिकारी (मबाक) (प्रतिनिधी) :- यांनी आपल्या विभागाकडील आढावा सादर केला यामध्ये मुख्यत्वे करुन ज्युदो-कराटे साठी केलेली तरतूद खर्च होणार नसल्याचे सांगितले.

**मा. श्री.सुरेश मोहिते,सदस्य** :- साहित्य वाटपासाठी जेवढे प्रस्ताव आलेले आहेत. त्यांना वाटपाची कार्यवाही तात्काळ करणेत यावे.

उपमुख्य कार्यकारी अधिकारी (मबाक) (प्रतिनिधी) :- शिलाई मशिन, सायकल प्राप्त प्रस्तावांची छाननी करुन पात्र लाभार्थीना वाटप करणेत येणार आहे.

**मा.श्री.सुरेश मोहिते,सदस्य** :- नविन प्रस्ताव घेण्यात येवू नयेत. कागदपत्रांची पुर्तता करुन लाभार्थीला लाभ देणेत यावा.

**मा.श्री.तानाजी यमगर,सदस्य** :- जिल्हयामध्ये डॉक्टर, एएनएम, एनएम ची पदे मोठया प्रमाणात रिक्त असून त्यांची भरती करणेत यावी.

एन.आर.एच.एम :- रिक्त पदे भरणेबाबत शासनाकडे पाठपुरावा करणेत येत आहे.

**मा.श्री.दिलीप बुरसे,सभापती मिरज** :- पंचायत समिती मिरज कडे कॅशिअरचे पद रिक्त आहे.

**मा.श्री.सुरेश मोहिते,सदस्य** :- १३ वा वित्त आयोगामधून घंटागाडी घेणेबाबतचा निधी ग्रामपंचायतीला वर्ग झालेला नाही.

**मुख्य लेखा व वित्त अधिकारी** :- ग्रामपंचायत विभागाने याबाबत कार्यवाही करणेची आहे.

**विषय क्र.४:-** सांगली जिल्हा परिषदेचा माहे फेब्रुवारी २०१५ च्या मासिक लेख्याला अर्थ समितीची शिफारस घेवून सदरचा विषय मान्यतेसाठी स्थायी समितीपुढे पाठविणे बाबत चार्चा करणेत येऊन ठराव समंत करणेत आला.

**यानंतर मा.सभापती यांचे परवानगीने ऐनवेळी येणा-या विषयावरती ठराव करणेत आले.**

**विषय क्रं. ५:** सन्मानीय सभापती पंचायत समिती पलूस यांचे माहे ऑक्टोंबर २०१४ ते माहे नोव्हेंबर २०१४ अखेर प्रवासभत्त्ता देयके ३ महीन्यापेक्षा जास्त कालावधी झाला असल्याने म.जि.प.व.पं.स (पदाधिकारी सदस्य व प्र.भ व दै.भत्ता)नियम १९६९ मधील नियम ७(४) नुसार वित्त समितीची मान्यता देणेबाबत विचार करणे.

यानंतर मा. उपाध्यक्ष तथा सभापती वित्त समिती यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले व ही सभा खेळीमेळीच्या वातावरणात पारपाडले बददल सर्वांचे पुन:श्च एकदा आभार मानुन सभा संपलेचे जाहिर केले.

सौ.शुभांगी पाटोळे
मुख्य लेखा व वित्त अधिकारी तथा
सचिव अर्थ समिती जिल्हा परिषद सांगली.

मा.श्री.लिंबाजी महीपती पाटील
सभापती अर्थ समिती
जिल्हा परिषद सांगली.

## भाग दुसरा

## दिनांक ०१.०४.२०१५ रोजी तहकुब होवून दिनांक ०९.०४.२०१५ रोजी झालेल्या ४४ व्या अर्थ समिती मासीक सभेचा कार्यवृत्तांत

**विषय क्र.१ :-** दि.०४.०३.२०१५ रोजी घेणेत आलेल्या वित्त समिती सभेचा अहवाल वाचून कायम करणे.
**ठराव क्र. ३०१ :** दि. ०४.०३.२०१५ रोजी घेणेत आलेल्या वित्त समिती सभेचा अहवाल वाचून कायम करणेत आला. ठराव सर्वानुमते मंजूर.

सुचक : श्री. तानाजी हरी यमगर, सदस्य.
अनुमोदक : मा.सौ.रुपाली विक्रमसिंह पाटील, सदस्या.

**विषय क्र.२ :-** शासना कडील महत्वाचे शासननिर्णय व पत्राचे वाचन करणे.
**ठराव क्र.३०२:-** शासना कडील महत्वाचे शासननिर्णय व पत्राचे वाचन करणेत आले. ठराव सर्वानुमते मंजूर.

सुचक : मा.श्री. भाऊसाहेब शामराव पाटील, सदस्य.
अनुमोदक : मा.सौ. कल्पना वसंतराव सावंत, सदस्या.

**विषय क्र.३:** माहे फेब्रुवारी २०१५ च्या सर्व खात्यांचा योजनानिहाय खातेनिहाय अनुदान व खर्चाचा आढावा घेणे.
**ठराव क्र.३०३:** माहे फेब्रुवारी २०१५ चा सर्व खात्यांचा योजनानिहाय खातेनिहाय अनुदान व खर्चाचा आढावा घेणेत आला. ठराव सर्वानुमते मंजूर.

सुचक:मा.श्री.दत्ताजीराव निळकंठराव पाटील, सदस्य.
अनुमोदक मा.श्री.दिलीप दत्तु बुरसे सदस्य.

**विषय क्रं.४:** सांगली जिल्हा परिषदेचा माहे फेब्रुवारी २०१५ च्या मासिक लेख्याला अर्थ समितीची शिफारस घेवून सदरचा विषय मान्यतेसाठी स्थायी समितीपुढे पाठविणेबाबत चर्चा करणे.

**ठराव क्र.३०४:** सांगली जिल्हा परिषदेचा माहे फेब्रुवारी २०१५ च्या मासिक लेख्याला अर्थ समितीची शिफारस घेवून सदरचा विषय मान्यतेसाठी स्थायी समितीपुढे पाठविणेबाबत ठराव सर्वानुमते मंजूर करणेत आला.

सुचक:मा.सौ.सुशिला हिंदूराव नांगरे, सदस्या
अनुमोदक मा.श्री.दिलीप दत्तु बुरसे सदस्य.

**यानंतर मा.सभापती यांचे परवानगीने ऐनवेळी येणा-या विषयावरती ठराव करणेत आले.**

**विषय क्रं. ५:** सन्मानीय सभापती पंचायत समिती पलूस यांचे माहे ऑक्टोंबर २०१४ ते माहे नोव्हेंबर २०१४ अखेर प्रवासभत्त्ता देयके ३ महीन्यापेक्षा जास्त कालावधी झाला असल्याने म.जि.प.व.पं.स (पदाधिकारी सदस्य व प्र.भ व दै.भत्ता)नियम १९६९ मधील नियम ७(४) नुसार वित्त समितीची मान्यता देणेबाबत विचार करणे.

**ठराव क्र.३०५:** सन्मानीय सभापती पंचायत समिती पलूस यांचे माहे ऑक्टोंबर २०१४ ते माहे नोव्हेंबर २०१४ अखेर प्रवासभत्त्ता देयके ३ महीन्यापेक्षा जास्त कालावधी झाला असल्याने म.जि.प.व.पं.स (पदाधिकारी सदस्य व प्र.भ व दै.भत्ता)नियम १९६९ मधील नियम ७(४) नुसार वित्त समितीची मान्यता देणेत येत आहे. ठराव सर्वानुमते मंजूर करणेत आला.

सुचक:मा.श्री.दत्ताजीराव निळकंठराव पाटील, सदस्य.
अनुमोदक मा.श्री सुरेश गणपतराव मोहितेपाटील, सदस्य.

यानंतर मा. उपाध्यक्ष तथा सभापती वित्त समिती यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले व ही सभा खेळीमेळीच्या वातावरणात पारपाडले बद्दल सर्वांचे पुन:श्च एकदा आभार मानुन सभा संपलेचे जाहिर केले.

सौ.शुभांगी पाटोळे
**मुख्य लेखा व वित्त अधिकारी तथा**
**सचिव अर्थ समिती जिल्हा परिषद सांगली.**

मा.श्री.लिंबाजी महीपती पाटील
**सभापती अर्थ समिती**
**जिल्हा परिषद सांगली.**